

# ज्योती

*******************************************************************************************

ईशान्य ओहायो मराठी मंडळ    www.neomm.org    NEOMM Tax ID: 34-1644989

Jan – Mar 2008

*******************************************************************************************

## कार्यकारिणी २००८

**अध्यक्ष: सुनंदा कुलकर्णी**

president@neomm.org

**उपाध्यक्ष: नितीन गोखले**

**सचिव: ज्योती हरवाळकर**

secretary@neomm.org

**कोषाध्यक्षा: स्मिता सामंत**

treasurer@neomm.org

**सांस्कृतिक कार्यवाह: शैला मुडे**

**'ज्योती'– संपादक: रजनी शेंदुरे**

editor@neomm.org

**'ज्योती' मुद्रक–वितरक: अजित जोशी**

**वेब मास्टर: चैताली नाडकर्णी**

**सहाय्य:** महावीर शेट्टी, सरोजिनी शेट्टी, विजय हरवाळकर

**विश्वस्त– मेधा गोडबोले, शोभा तामसकर, कृष्णा देशपांडे**

*************************

## ज्योतीसाठी साहित्य

गावातील साहित्यिक मंडळींकडून *ज्योती* मध्ये साहित्याची आवश्यकता आहे. आपले लेख, कथा, कविता, ईनोद; दर सम महिन्याच्या (फेब्रु., एप्रिल, जून इत्यादि) १५ तारखे पर्यंत इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवावे. मराठी टायपिंगची सोय हस्तलिखित पानी $१० दराने उपलब्ध आहे.

*******************

## संपादकीय---

**नमस्कार मंडळी!**

सहसा नवे वर्ष नव्या आशा घेउन येते.  या वर्षाचे पहिले त्रैमासिक मात्र नवे प्रश्न घेउन सामोरे आले. एकीकडे महागाईची वाढती कमान तर तिकडे आर्थिक बाजारांची घसरगुंडी चालु आहे. अशा वेळी बहुतेकांचे डोळे दिसामाशी गतीमान होत असलेल्या अध्यक्षीय निवडणुकीच्या धामधुमीकडे लागले आहेत. आता या अवघड प्रश्नांची उत्तरे कोण आणि कशी सोडवतो ते फ़क्त भविष्यालाच ठाउक.

ज्या गोष्टींबद्दल आपण काहीही करू शकत नाही त्याची चिंता तरी का करायची हे खरे असले तरी आपण आपापल्या परीने वेगवेगळे खर्च करुन आणि जमेल तशी बचत करुन अर्थव्यवस्थेला हातभार लावीत असतोच. बाकी महागाई असो नसो माझ्या माहितीतल्या कोणी आपापले खार्चिक बेत बदललेले ऐकिवात नाही. कर्ज काढावे लागले तरी खिसमसच्या निमित्ताने लोक नको असलेल्या गोष्टी भेट म्हणुन देतच असतात. आपल्याला न परवडणारी घरे घेतच असतात. एका परीने ही सत्य परिस्थितीकडे डोळेझाक करायची वृत्ती सगळीकडे दिसू लागली आहे. मग त्याचे उलटे प्रतिबिंब देशाच्या अर्थव्यवस्थेत दिसले तर नवल कसले? असो. या वर्षाबरोबर येणारी नवी पावले यातुन मार्ग काढतील अशी आशा करुया.

नव्या वर्षाबरोबर नवी विटी नवा दांडू घेऊन मंडळाच्या नव्या कार्यकारिणीचे काम नव्या उत्साहाने चालु झाले आहे. त्या उत्साहाचे स्वागत करुन हा पूर्णविराम.

रजनी शेंदुरे

*************************************

### Upcoming Events

| | |
|---|---|
| मार्च २२: | होळी |
| मे ३: | महाराष्ट्र दिन |
| सप्टेंबर ६: | गणपती |
| नोव्हेम्बर १: | दिवाळी |

**Please spread the word about these events and help make them a huge success.**

## आगामी कार्यक्रम

**होळी**

मराठी गाण्यांचा धमाल कार्यक्रम

**माय मराठी**

शनिवार, **२२ मार्च २००८**

सायंकाळी साडेचार वाजता

**स्थळ: सोलन कम्युनिटी चर्च**

33955 Sherbrook Park Dr.
Solon, Ohio 44139

4.30pm - 5.00pm Registration
5.00pm- 5.30pm Holi dahan
6.00pm-7.00pm Dinner
7.00pm-9.00pm Mai Marathi

Members with RSVP: $15
Members without RSVP: $20
Non-members: $25
Students: $ 15

**RSVP:** Please e-mail secretary@neomm.org
**Call:** Jyoti: (216) 692-9773
OR Sunanda: (440) 423-1446
OR Smita: (440)725-1503

By Noon on March 20, 2007 and let us know how many will attend this program.

********************

## Advertisement Rates

per bimonthly issue

| | |
|---|---|
| Qrtr Page: | $25 |
| Half Page: | $50 |
| Full Page: | $75 |

. **All rates for the Diwali issue are double.**

********************

**अध्यक्षीय–मनोगत**

**गंगेत घोड न्हाल. व्हय, व्हय गंगेत घोड न्हाल.**

मराठी भाषेची गंगा अमाप आहे. आणि सतत वहात आहे. अगदी इथे या अमेरीकेत, क्लिव्हलँड मधे सुद्धा. तर म्हटल चला त्यात डुबून आपणही पवित्र होऊया.

म्हणजे त्याच काय आहे . . . हळू हळू मुले मोठी झाली. काही जण आजी–आजोबाही झाले. काळाप्रमाणे गरजाही बदलल्या. घरोघरी झी–टीव्ही सारख्या अनेक माध्यमातून Indian channels व कार्यक्रम आपल्या दिवाणखान्यात स्थानापन्न झाले. कलाकारांचे येणे–जाणे वाढले. थोडक्यात world is become flat.

या आणि काहीं कारणांनी मराठी मंडळाची कार्यक्रमांना उपस्थिती रोडावली. जेम–तेम ५०–६० माणसं सुद्धा नसतात हो. त्यामुळे की काय पण कोणी पुढेच येत नाही मंडळावर काम करायला.

यंदा सुद्धा हेच झाले. जो तो दुसऱ्याला सांगतो तुम्हीं व्हा प्रेसीडेंट. आमचं झाल आहे. आता अशा परिस्थितीत वाटत काय होणार या मंडळाचं पुढे!! कोणीच पुढे येत नाही अस बघून निर्णय घेण्यात आला की जानेवारी पर्यंत थांबून बघूया. निदान आजचा कार्यक्रम तरी उरकूया.

गंमत म्हणजे 'जनी ते रजनी' हा कार्यक्रम खरोखरच चांगला झाला. माझी ऊमेद वाढली आणि . . . . तशातच मेधा म्हणाली "अग कसली काळजी करतेस? आम्हीं आहोत ना. तू हो अध्यक्ष." झाल . . . आमच तारू तरारल. आणि म्हटले चला होऊन जाऊया प्रेसीडेंट.

हा हा म्हणता बातमी पसरली आणि अस्मादिक GOT Elected. दुजोरा द्यायला सर्वांनी हात वर केले.

पण . . . जेव्हां कॉल करून विचारले तेव्हां बऱ्याच जणांनी नन्नाचा पाढा वाचला. मुलांचा पहीला प्रश्न "Are you crazy or what? Where do you have time to do the work?" वगैरे वगैरे. पण माझ एकच उत्तर मला आवडल. असल काही करायला जर कोणी नाही मिळाल तर एकटी सुद्धा करून दाखवीन पण हार मानणार नाही.

पण माझ नशीब बलवत्तर!! हळू हळू कार्यकारी मंडळाला रूप आणि आकार आला. पण एवढ्यावरच थांबून चालणार नाही. मला आपल्या सर्वांच सहकार्य हव आहे. सहकार्याची एक साखळीच तयार करून या मंडळाला घट्ट बांधून घेऊया. मला खात्री आहे स्वतःहून पुढे येऊन आपणच आपल्या संस्कृतीला उजाळा देणार आहात. आणि पुन्हा एकदा हे मराठी मंडळ ताजतवानं होणार आहे. नव्या एकजुटीने पुढील वाटचाल करूया.

बऱ्याच वर्षानी पुन्हा एकदा मंडळाच्या कार्यकारिणीत मी काम करणार आहे. तेव्हां चुकलं माकलं पदरात घालून घ्या एवढीच विनंती!! अनवधानाने कुणाला दुखावलं असल तर आधीच माफ़ी मागते. ह्या कामातून आनंद आणि समाधान मिळो हीच प्रभु चरणी विनंती. म्हटलच आहे की हे विश्व अनंत आहे. जेवढे द्यावे त्याच्या कितीतरी पटींनी परत आपल्याला मिळते. 'अनंत हस्ते कमलाकराने देता किती घेशील दोन कराने' या उक्ती प्रमाणे आपली झोळी जरा न फाटणारी बनवूया.

कळावे लोभ असावा.

– सुनंदा कुळकर्णी


*Sunny's*

**ASIAN**

**FOOD & SPICES**

Monday - Saturday 11am - 8pm
Suday 11am - 7pm

6281 SOM Center Rd.
Solon, Ohio 44139

Phone: 440-248-0801
Fax: 440-248-0166

**संध्याछाया**

साठीच्या भोज्ज्याला शिवल्यापासुन सत्तरीचे क्षितीज दिसायला लागते. गुडघेदुखी, सौम्य हृदयविकार, मधुमेह यापैकी कोणता विकार आपल्या वाट्याला येणार आहे याची खात्री नसते. त्यामुळे हातपाय धड आहेत तोपर्यंत जमेल तेवढे जग बघून घ्यावे असा विचार करून आम्ही साठोत्तर मंडळी दर वर्षी नवनव्या सहलींना जात राहतो.

पण वृध्दत्वाच्या संध्याछायांची खरी जाणीव होते ती एखाद्या वैद्य परिक्षेत गुडघा–बदल किंवा तत्सम शस्त्रक्रिया करावी लागेल असे निदान होते तेव्हा. हॉस्पिटलमधून घरी आले की शारिरीक कळा तर आपल्या आपल्याच भोगाव्या लागतात. त्यातुन सुटका नसतेच. पण अशा वेळी मनातल्या एकलेपणाच्या कळा असह्य होत असल्या तर नवल नाही.

मुले, मुली, सुना आपापल्या नोकरी उद्योगात व्यग्र असतात. जिवनसाथी बरोबर असतो पण त्याखेरीज अशावेळी गरज असते मित्रमंडळींची. मानसिक आधार देण्यासाठी किंवा नुसत्या सहज गप्पांनी वेदना हलक्या करण्यासाठी.

खुपवेळा असे होते की अमका तमका बराच आजारी होता हे तो बरा झाल्यानंतर समजते. मला असे वाटते की आपण सर्वांनी ही आपली जबाबदारी समजून कोणी आजारी पडले तर त्याची माहिती एकमेकांना द्यायला हवी. कारण अशा जरुरीच्या वेळी मित्र–मैत्रिणींचे वर्तुळ जेवढे मोठ्ठे असेल तेवढे चांगले. आपल्या मंडळातील मंडळींचे हे वर्तुळ आधिक मोठे व बळकट होत जावो ही नव्या वर्षाची सदिच्छा!

रजनी शेंदुरे

**************************************

**असेच सरळ जा –**

आमच्या ड्रायव्हरनं खिडकी खाली करून विचारलं, *अहो काका, पालीच्या गणपतीकडे जाणारा हाच रस्ता का ?* ते सद्गृहस्थ हातवारे करत म्हणाले, *हो, हो, हाच. असेच सरळ जा.* मी नाक खुपसून विचारलं, *पण काय हो, आणखी किती दूर आहे ?* तेव्हां त्या सद्गृहस्थांचे साथीदार म्हणाले *अहो, हे आलंच. असेच सरळ जात रहा. मुळीच दूर नाही?*, आम्हीही स्वस्थ होऊन टेकून बसलो. येतंय येतंय म्हणतां पाली आणखी १५–२० कि.मी. (म्हणजे किलोमीटर हे लक्षात आलं असेलंच) पुढे होतं. आणि पाली गांव जवळ आल्यावर विचारतां आणखी एका मावशींनी सांगितलं, *या पुढच्या चौकात डावीकडे वळा व सरळ जात रहा.* वळणाचा चौक बराच पुढे होता, आणि वळणानंतरच्या त्या वाटेनं डोंगराळ भागातून आणखी २–४ कि.मी. गेल्यावर मुक्कामाला पोहोचलो. पण वनसराई मात्र मुलांनांही खूप आवडली.

आपल्या मराठी मनाची मला नव्यानं ओळख झाली व मुलांनां तर या तऱ्हेनं प्रथमच. विचारणाऱ्याचा निरुत्साह न करणें, प्रोत्साहन देणे, हे जणूं मराठी ब्रीद – लहान गावांत तरी, मुंबई–पुण्याची गोष्ट वेगळी असेल – मुले शिकली. आमची मुलांसह भारतभेट कोकणच्या प्रवासानें सुरु केली होती. या आधीच्या – म्हणजे बऱ्याच वर्षांपूवीच्या – प्रवासाचे वेळी मुलं तशी लहान होती. आतां मोठी असल्यानें हे सर्व बघून टीका – बरे–वाईट सर्व – करायला सज्ज होती. ही तर नुसती पहिली झलक होती.

पालीचा गणपति इतर अष्टविनायकांसह एक महत्त्वाचा गणपति आहे हे सांगितल्यावर त्यांनीं माना डोलावल्या. त्या काकांची *सरळ* म्हणतानां हातवारे करायची पद्धत मुलांनीं टिपून ठेवली होती. पुढचा टप्पा होता दिवेआगरचा, व वाटेत हरिहरेश्वर पाहण्याची इच्छा होती. आणखी एकदोन वेळां त्याच प्रश्नाचं त्याच हातवाऱ्यांसह तेच *सरळ* उत्तर मुलांनां पाठ झालं होतं व त्यांनीही त्याची गंमतीदार नक्कल करायला सुरुवात केली होती.

आम्ही उरलेला कोकणचा प्रवास राजमार्ग सोडून आंतल्या रस्त्यांनी केला. जिकडेतिकडे रस्ता दुरुस्ती चालू होती, व त्यामुळे आधीच अरुंद असलेले रस्ते आणखीच चिंचोळे झाले होते. त्यांतही समोरून येणारे वाहन आणि आमची गाडी नसलेल्या जागेतून असलेली वाट काढून एकमेकांनां पार करतानां पाहून मुलांनां, व खरे तर आम्हांलाही, खूप कौतुक वाटलं. खरी चुणूक दिसली ती समोरचे वाहन, रिक्शा असो कीं लॉरी असो, बिनधास्त रस्त्याच्या मध्यभागी सामोरे येतांनां. दोन्ही वाहनें – आमची गाडी (भाड्याची, बरं का.) व समोरून येणारे वाहन – अगदी आमने–सामने आल्यावर आयत्या वेळी थोडीशीच बाजूला सरकून पार करायची. पहिल्या प्रसंगीं मुलांनां हादराच बसला. न्यू यॉर्कच्या रस्त्यांवरही एवढी चकमक त्यांनी पहिलेली नव्हती. पण तीही पुढे निर्दावली. *इंच इंच लढवू* या दुसऱ्या मराठी ब्रीदवाक्याची ओळख झाली. आणि याचा आणखीही घोर अनुभव हमरस्त्यांवर यायचा होता.

हरिहरेश्वराचा रस्ता गाठायला जरा उशीरच होत होता. फार वेळ लागणार असेल तर आत्ता नको उद्या बघू असा विचार होता. म्हणून अशाच एका पानाच्या धाब्यावर विचारतां म्हणाले, *अहो, अगदी चांगला रस्ता आहे. १०–१५ मिनिटांत येईल. किती दूर आहे?. असेल ८–१० किमी.* प्रत्यक्ष होते १८ किमी, आणि लागला पाउण तास. सुरुवातीचे २–३ किमी नवीन रस्ता होता, व उरलेला दुरुस्तीखाली, खडी व खाचखळग्यांनी भरलेला. अर्थात त्या वाटेनेच दिवेआगरकडे परत यायचे होते. हरिहरेश्वराचे दर्शन घेऊन, समुद्रकिनारा पहिला. सूर्यास्त चुकल्याची हळहळ वाटली. आमचे वेळेचे सर्व अंदाज चुकायला जी सुरुवात झाली ती सातारयाला पोहोचेपर्यंत.

दिवेआगरला राहायची जागा अगदी रम्य ठिकाणी होती. दुसऱ्या दिवशी जवळचाच *सोन्याचा गणपति* पाहून पुढे जाणार होतो. त्या मंदिरापेक्षां त्याचा इतिहासच लक्षात राहण्यासारखा होता. या आणि आणखी एका देवस्थानाचा इतिहास कसा मुसलमानी राज्यात जुलुमाखाली घडला होता याची अनपेक्षित ओळख मुलांनां प्रथमच व आम्हांला पुन्हां एकदा झाली. आणि याचाच आणखी पुरावा पुढे दिल्लीत कुतुबमिनारच्या ठिकाणी पाहायला मिळाला.

पुढचा टप्पा दापोलीचा. हरिहरेश्वरावरून पुढे घाट उतरून मग खाडी पार करायची होती बोटीवरून, म्हणजे (barge) बार्जवरून. वेळ आणि अंतरांचा अंदाज कुणाच्या सांगण्यावरून लावायची सोयच नव्हती. वाटेत एका छोट्या गावांतून जातांनां बऱ्याच गाई रस्त्यात आल्या होत्या. एक गाय अगदी गाडीसमोर येउन थांबली, अर्थात गाडी थांबलीच. गायीनं आमच्याकडे वळून बघितलं आणि संथपणे *जाऊ दे या पावन्यांनां* अशा थाटात पुढे गेली. गंमत वाटली. आम्ही गाडी थांबवून खाली उतरलो होतो, फोटो काढले. व मार्गाला लागलो.

जवळच पुढे एक वृद्ध गृहस्थ रस्ता ओलांडत होते, अर्थात अगदी हळूहळू. पण तेही मध्यभागी येऊन थांबले, अर्थात गाडीही पुन्हां थांबली. त्या गृहस्थांनी थांबून, मान वळवून आमच्याकडे पाहिलं. आणि तेही *जाऊ दे या पावन्यांनां* अशा थाटात संथपणे पुढे गेले. मुलांनां राहवले नाही. *दॅट गाय् (guy) इज् लाईक् द गाय* अशी कोटी केलीच. नुकत्याच पहिलेल्या गाई, त्यांची लकब, थंडपणा आणि मराठी शब्दाची इंग्रजीशी पडलेली गांठ. आम्ही सगळेच हंसलो.

बार्जवर गाडी नेण्याचा अनुभव विलक्षणच. ही खरं तर आमेरिकेत पाहिलेली गोष्ट. पण त्याची मराठी पद्धत आगळीच. छोटीच बार्ज. तिच्यात २–३ गाड्यांहून अधिक मावणें अशक्यच वाटत होते. आमची गाडी लाइनीत पहिली होती. म्हणून निश्चिंत होतो. आमचा ड्रायव्हर अनुभवी होता, तो म्हणाला *या ५–६ गाड्या सहज जातील.* आणि तसेच झाले. *एकमेकां साह्य करू । अवघे धरू सुपंथ ।* हे संतवचन खरे करून दाखवले. वर एक रिक्शा व एक मोटरसायकलही माववून दाखवली. कोणालाही मागे सोडून जायचे नाही हा जणू निश्चय.

आतापर्यंतच्या वाटेत सतत घाटाचा चढउतार, ती वळणें. वाहनांची अवघड जागेतूनही एकमेकांच्या बाजूनें वाट काढणें व तसे करतानां कोणीही एकमेकांवर न रागावणें हा मराठी साधेपणा मुलांनां भावला. त्यांची ती स्वतःच्या मराठी वारश्याची ओळख त्यांना आवडली. थोड्याफार फरकानें ही भारतीय स्वभावाचीही ओळख त्यांच्या लक्षात आली.

– कौस्तुभ लेले

# B D S

Financial Service Corporation

*Registered Investment Advisor*

Are your investments focused on your future … or just on today's headlines?

We can help you to

Prepare a roadmap for your future & to stay the course!

**Our services include:**

Retirement Planning    Investment Planning    Savings for College    Tax Planning

Visit our website **www.bdsfsc.com** to learn more about us.

To get a second opinion,

call us at 440-248-5625 Or e-mail to BDS@BDSFSC.com

***Ashok Shendure**, MS, MBA, CFP®, CEBS*    ***Rajanee Shendure**, MBA, CFP®*



**If not delievered, please return to:**
Rajanee Shendure
17460 Deepview Dr.
Chagrin Falls, OH 44023.